# ECHO OF HIS CALL

## बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

**India's National Spiritual Newspaper** ₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHAUL BENJAMIN SHINDE

VOL: XXVII YEAR OF OUR LORD JESUS CHRIST, 2025 FEBRUARY No. 01


### पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र : २१:२२-३१

२२. ज्ञानवान मनुष्य बलवानांच्या नगरावर चढतो, आणि त्यांच्या निर्भयपणाचे दुर्ग मोडून पडतो.

२३. जो आपले तोंड व आपली जीभ सांभाळतो, तो आपला जीव संकटांपासून सांभाळतो.

२४. गर्विष्ठ व चढेल मनुष्य, ह्याचे नाव तिरस्कारी असे आहे, तो गर्वाच्या तोऱ्याने वागत असतो.

२५. आळशाची इच्छा त्याला मारून टाकते, कारण त्याचे हात श्रम करायला मान्य होत नाहीत.

२६. सारा दिवस लोभिष्ठपणाने हाव धरतो असा कोणी आहे, परंतु न्यायी देतो आणि राखून ठेवीत नाही.

२७. दुष्टांचा यज्ञ वीट असा आहे, तर तो आपला यज्ञ दुष्ट संकल्पाने आणतो तेव्हा तो किती अधिक वीट असा आहे!

२८. खोटा साक्षी नाश पावेल, परंतु जो मनुष्य ऐकतो तो जे बोलेल ते टिकेल.

२९. दुष्ट मनुष्य आपले मुख धीट करतो, परंतु जो सरळ आहे तो आपला मार्ग नीट करतो.

३०. काही ज्ञान, काही बुद्धी किंवा काही मसलत यहोवाच्या विरुद्ध चालत नाही.

३१. लढाईच्या दिवसासाठी घोडा तयार करण्यात येतो, परंतु तारण यहोवाकडूनच होत आहे.

# जिंकण्यासाठी धावा!



## RUN TO WIN!

*सन्माननीय प्रमुख संपादक, रेव्ह. ॲन्जेलाइन सेल्वाकुमारी*



ते १९८६ मधील आशियाई खेळ होते आणि सेऊलमध्ये ८०० मीटर फायनल होणार होती (कदाचित तेव्हा तुमचा जन्मही झाला नसेल). भारतातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंपैकी एक असलेल्या शायनी अब्राहमच्या खेळाच्या थरारक शेवटाची आतुरतेने वाट पाहत संपूर्ण देश आपापल्या जागी खिळून होता. ती सुवर्णपदक मिळवेल अशी लोकांची आशा असल्याने त्यांच्या अपेक्षेने कळस गाठला होता.

जेव्हा शायनीने प्रथम अंतिम रेषा ओलांडली तेव्हा प्रत्येक भारतीयाला झालेला अभिमान आणि आनंद हा अवर्णनीय होता. देशभरातील घराघरांतून जल्लोषाचा आवाज घुमला. तथापि, उत्साह अल्पकाळ टिकला. काही क्षणांनंतर, अशी घोषणा करण्यात आली की, शायनीला धावपट्टी बदलल्यामुळे लागलीच अपात्र ठरविण्यात आले.

समस्त देशावर निराशा पसरली. जो विजय मिळवण्यास शायनीची पात्रता होती त्याच्यासाठी तिची मेहनत, जिद्द आणि अथक परिश्रम पुरेसे नव्हते. केवळ शायनीसाठीच नाही, तर तिचे कौतुक करणाऱ्या आणि तिच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक भारतीयासाठी हा एक मोठा धक्का होता.

(...पान ३ वर)




## एको ऑफ हिज कॉल

### यू ट्युब ख्रिश्चन चॅनल !

पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी
पाच मिनिटांचा संदेश

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे २.०० वाजल्या पासून
रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

* कृपा करुन सबक्राईब करा *

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)

REACHING NATIONS



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

HON. EDITOR-IN-CHIEF
Rev. Angeline S. Kumari, M.A., M.Sc., M.Ed.
HON. MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.
GENERAL MANAGER
Bro. N. Prakasam, M.A., M.Sc.(C&P), PGDHRM, MBA.
ADMINISTRATION
Sis. Jesy Veena Sam
Adv. K. Puratchivendan, M.Com., C.A., B.L.
Dr. P.E.R. Premchand, M.Sc., M.A., M.Ed., Ph.D.
Dr. C.G.S. Baburao, B.Tech., M.Tech. (DM), Ph.D.
Dr. Rabinder Boaz, M.S. (CMC)
EDITORIAL BOARD
Dr. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Sis. Sajini Cherian
Rev. Dr. K.R. Rajasekaran
Rev. Dr. William Robert, Ph.D., DD, D.Lit.

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 98412 71858
95661 31858
E.MAIL
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in
WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com
YOUTUBE CHANNEL
Echo of His Call

**मी तुला आशीर्वाद देईनच देईन, व तुला वाढवीनच वाढवीन – इब्री. ६:१४**

प्रभूमधील माझे प्रियजन,

आपला प्रभू आणि तारणहार, येशू ख्रिस्त याच्या मौल्यवान नावाने हार्दिक अभिवादन!

आपण नवीन वर्ष २०२५ मध्ये प्रवेश करीत असताना, देवाला त्याच्या विपुल कृपेसाठी आणि विश्वासूपणासाठी गौरव देऊया. त्याच्या पवित्र नावाची स्तुती असो!

तुम्ही कसे आहात? मला आशा आहे की, हा संदेश तुम्हाला चांगले आरोग्य आणि दृढ विश्वासात मदत करील. आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताने आपल्यावर केलेल्या अगणित आशीर्वादांसाठी आपण सदैव कृतज्ञ राहिले पाहिजे. आज सकाळी मी तुमच्या आध्यात्मिक, शारीरिक आणि भावनिक आशीर्वादासाठी प्रार्थना केली.

माझ्या मनावर खोलवर प्रभाव टाकणारा अध्यात्मिक संदेश हा तुमच्याशी सामायिक करावा असे मला वाटले:

### शिस्त लावणे ही शिक्षा नाही!

देव आपल्याला नियमितपणे करीत असलेल्या बचावाचा आपण जेव्हा पूर्णपणे स्वीकार केल्याशिवाय किंवा प्रशंसा केल्याशिवाय अनुभव घेत असतो, तेव्हा आपण कदाचित आत्मसंतुष्ट बनतो. अभिमान आपल्या अंतःकरणात अस्पष्टपणे रेंगाळू लागतो, देवावरील आपले अवलंबित्व कमी होऊ लागते आणि त्यामुळे आपल्या कृतज्ञतेमध्ये घट होते. देव प्रेमाने आपल्याला सुधारण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी दटावतो.

जेव्हा केवळ दटावण्यामुळे बदल घडत नाही, तेव्हा आपल्याला नम्र करण्यासाठी आणि त्याच्या जवळ आणण्यासाठी देव शक्यतो दुःखाच्या क्षणांना अनुमती देतो. स्तोत्रकर्त्याने स्तोत्र ११९:७५ मध्ये शिक्षा म्हणून नव्हे, तर आपल्याला चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखण्यासाठी प्रेमळ सुधारणा म्हणून अशा प्रकारच्या दुःखाचा उल्लेख केला आहे.

देवाचे चारित्र्य प्रेम आणि विश्वासूपणामध्ये आहे. त्याचा विश्वासूपणा स्थिरता आणि अटल वचनबद्धता दर्शवते. मनुष्याप्रमाणे देव द्वेषाचा बदला घेत नाही; त्याऐवजी, तो त्याच्या प्रेमात स्थिर राहतो. आज्ञाभंगाची शिक्षा म्हणून दुःखाचा चुकीचा अर्थ लावू नका. शिक्षा ही देवापासून विभक्त असलेल्यांसाठी राखीव आहे, तर शिस्त ही, जे क्षणभर आपल्या मार्गापासून भरकटले आहेत, त्या मुलांसाठी प्रेमाची कृती आहे.

देव आपल्या मुलांना राग या भावनेने नाही, तर त्यांची वाढ आणि भरभराट व्हावी या तीव्र इच्छेमुळे शिक्षा करतो. हे समजून घेतल्याने आपल्याला कृतज्ञ अंतःकरणाने आणि योग्य मनोवृत्तीने शिक्षा स्वीकारण्यास मदत होते. योसेफ हे एक खूप मोठं उदाहरण आहे, ज्याने योग्य दृष्टीकोन ठेवला आणि दुःख स्वीकारले (उत्पत्ति ५०:१५-२१).

**"हे यहोवा, मी जाणतो की, तुझे निर्णय न्यायाचे आहेत, आणि तू सत्यतेनेच मला पीडिले आहे."** - स्तोत्र ११९:७५.

देव तुम्हाला भरपूर आशीर्वाद देवो!

ख्रिस्त येशूमध्ये तुमचे दास

अ‍ॅलेक्स सॅ मसन सॅम
पास्टर एस्. सॅम सेल्व राज

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : sam@echoofhiscall.org

Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) YouTube Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

## कृपया इथे लक्ष द्या!

आमचे **एको ऑफ हिज कॉल** यूट्युब चॅनलवर आमचे ५ मिनिटांचे मननपर संदेश दररोज पहाटे २.०० वाजता तामिळ, तेलगू, इंग्रजी आणि हिन्दी या भाषांमध्ये प्रसारीत होत असतात. ते संदेश ऐकून तुम्ही देवाची कृपा प्राप्त करु शकता.

आणखी माझे मोबाईल क्रमांक ९८४१०७१८५८, आणि ९८४१२७१८५८ (वैयक्तिक) तुमच्या मोबाईलमध्ये जतन करुन ठेवा.

**- पास्टर एस्. सॅम सेल्वा राज**

(पान १ वरुन...)

आजही, जेव्हा जेव्हा त्या क्षणाचा मी विचार करते, तेव्हा तेव्हा मनापासून आदर आणि कौतुक असणाऱ्या सर्वोत्कृष्ट क्रीडापटू शायनी, हिच्याबद्दल माझ्या हृदयाला वेदना होतात.



## जिंकण्यासाठी धावा!

जीवन ही एक शर्यत आहे आणि देवाने आपल्या प्रत्येकासाठी एक अद्वितीय ट्रॅक तयार केला आहे. काही अति जलदशील धावपटू आहेत, काही लांब पल्ल्याचे धावपटू आहेत, तर काही ट्रॅकवरील अडथळे पार करीत धावणारे धावपटू आहेत, परंतु त्या प्रत्येकाला विशिष्ट कौशल्ये आणि रणनीतीची आवश्यक असते. आपण दुसऱ्याच्या शर्यतीत धावू शकत नाही, कारण देवाने प्रत्येकाचा प्रवास त्याच्या दैवी योजनेनुसार तयार केला आहे.


प्रत्येक प्रकारच्या शर्यतीसाठी वेगवेगळ्या स्तरांवरची क्षमता, धोरण आणि ऊर्जेची आवश्यक असते. एक अति जलदशील धावपटू लांब पल्ल्याच्या धावपटूमध्ये सहजगत्या स्वतःला बदलवू शकत नाही किंवा लांब पल्ल्याचा धावपटू प्रचंड मेहनत आणि तयारीशिवाय अति जलदशील धावपटूप्रमाणे उत्कृष्ट कामगिरी करू शकत नाही. त्याचप्रमाणे, आपल्यासमोरील शर्यतीमध्ये आपण धावण्यासाठी देव त्याच्या कृपेने आणि क्षमतेने आपल्याला सुसज्ज करतो.

तुम्ही इतरांच्या शर्यतीतल्या अंतिम लाईनवर लक्ष केंद्रित न करता, देवाने आपल्यासाठी अलौकिकपणे तयार केलेल्या उद्देश्यावर लक्ष ठेवून आपल्या स्वतःच्या शर्यतीमध्ये चिकाटीने धावूया.

कारण शर्यत लोकप्रिय, अप्रतिम, किंवा सुरक्षित पद्धतीची आहे म्हणून जेव्हा अशाप्रकारच्या शर्यतीमध्ये धावण्याचे आपण ठरवतो, तेव्हा आपल्या शर्यतीतील उद्देशांचे वास्तव आपण गमावून बसतो. असे केल्याने आपण खरोखर महत्त्वाची असलेली शर्यत जिंकू शकत नाही. देवाने आपल्याकरिता उभारलेल्या ट्रॅकवरून स्थिरतेने धावत राहणे आणि त्याचे वचनदत्त बक्षीस मिळवणे हेच आपले अंतिम ध्येय आहे.

आपल्याला ठरवून दिलेल्या मार्गापासून आपण जर भटकलो आणि दुसऱ्याच्या मार्गावर धावू लागलो, तर जरी आपण ती शर्यत सर्वप्रथम पूर्ण केली, तरीही ती आपण जिंकणार नाही व आपल्याला बक्षीस मिळणार नाही. म्हणूनच, पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते: **"पैजेच्या धावणीत धावणारे सर्व धावतात, पण एकालाच पैज मिळते, हे तुम्हांस ठाऊक नाही काय? तुम्हांस मिळेल असे धावा."** - १ करिंथ ९:२४.

## आपण शर्यतीत कसे धावले पाहिजे?



## १. विश्वासाने धावा!

**"मी चांगले युद्ध केले आहे, धाव संपवली आहे, विश्वास राखला आहे."** - २ तीमथ्य ४:७.

बक्षीस जिंकण्यासाठी, आपण विश्वासाने धावले पाहिजे. आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विश्वासूपणा आवश्यक आहे - आपलं काम असो, वैवाहिक जीवन असो, आर्थिक उत्पन्न असो, नातेसंबंध असो किंवा आध्यात्मिक प्रवास असो.

जी शर्यत धावण्यासाठी देवाने आपल्याला बोलावले आहे ती साधी नसून एक युद्ध आहे. ज्याप्रमाणे पौल म्हणतो, मी चांगले युद्ध केले आहे. आपल्या जीवनातील देवाचा उद्देश्य हाणून पाडण्यासाठी ज्याने निर्धार केलेला आहे, त्या जगाच्या अधिपतीविरुद्ध प्रतिदिन अध्यात्मिक लढाईत आपण गुंतलेले असतो. त्याचे कार्य स्पष्ट आहे: **चोरी करणे, ठार मारणे, व नाश करणे** (योहान १०:१०). तो निर्मात्याप्रती असलेल्या आपल्या विश्वासूपणाची परीक्षा घेण्यास तत्पर असतो, ही एक रणनीती आहे जी त्याने एदेन बागेत सुरू केली.

सर्पाने देवाच्या विश्वासूपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि हव्वेच्या मनात शंकेचे बी पेरले. या कृतीमुळे तिचा देव आणि त्याच्या आज्ञेवरील विश्वास ढासळला आणि शेवटी तो नाश पावला. जसे लिहिले आहे : **"आणि साप स्त्रीला म्हणाला, तुम्ही खरोखर मरणार नाही; कारण देव जाणतो की तुम्ही त्यातून खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील, व तुम्ही देवाप्रमाणे बरे आणि वाईट जाणणारी व्हाल."** (उत्पत्ती ३:४-५).

या फसवणुकीच्याद्वारे, सर्पाने आदाम आणि हव्वा यांचे त्यांच्या निर्मात्याशी असलेले सुंदर नाते चोरले, नष्ट केले आणि संपुष्टात आणले.

देव आपल्याला विश्वासू राहण्यासाठी बोलावतो कारण तो विश्वासू आहे. इब्री १०:२३ आपल्याला त्याची आठवण करून देते: **"आपण आपल्या आशेचा अंगीकार अढळ धरावा, कारण ज्याने वचन दिले तो विश्वासू आहे."**

जेव्हा देव वचन देतो तेव्हा तो ते पूर्ण सुद्धा करतो. तुमच्या प्रार्थना

वर्षानुवर्षे अनुत्तरीत राहिल्यासारखे वाटत असतानाही, तो तुम्हाला विसरला नाही हे जाणून घ्या. स्तोत्र ५६:८ आपल्याला खात्री देते की, देवाने प्रत्येक अश्रू गोळा करून त्याच्या वहीत ती टिपलेली आहेत. तो नेहमी त्याच्या लोकांशी विश्वासू आहे आणि योग्य वेळी तो त्यांना उत्तर देईल.

म्हणून, तुम्ही त्याचे कार्य डोळ्यांनी पाहू शकत नसतानाही, तुमचे धावणे चालूच ठेवा. आपल्या विश्वासयोग्य देवावर विश्वास ठेवण्यासाठी दृढ विश्वासाची आवश्यकता आहे. देवाने आधीच आपल्याला चेतावणी दिलेली आहे : ''**जी काही संकटे तुला सोसायची आहेत त्यांचे भय धरू नको; पाहा, तुमची परीक्षा व्हावी म्हणून सैतान तुम्हांमधील कित्येकांस तुरुंगात टाकणार आहे, आणि तुम्हांला दहा दिवस संकट प्राप्त होईल, मरणापर्यंत विश्वासू ऐस, म्हणजे मी तुला जीवनाचा मुगूट देईन.**'' – प्रकटीकरण २:१०.

आपण धावत असलेली शर्यत काही सोपी नाही – ती अडथळ्यांच्या शर्यतीसारखी दिसते, म्हणजे पाण्याच्या उड्या, मोकळे खड्डे आणि काटेरी कुंपण अशा विविध अडथळ्यांनी भरलेली आहे. तरीसुद्धा, आपल्याला धावत राहण्यासाठी, विश्वासात स्थिर राहण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे.

आपल्यासमोर जरी शारीरिक, भावनिक, आध्यात्मिक किंवा आर्थिक संकटे आणि आव्हाने असली, तरी जर आपण विश्वासात दृढ राहू, तर आपल्याला विजयाचा मुकुट मिळेल. शर्यतीच्या अर्ध्यावर थांबणे किंवा मागे वळणे आपल्याला परवडणारे नाही. किंबहुना, आपण आपल्या अंतःकरणाने प्रामाणिक आणि आत्म्याने विश्वास ठेवला पाहिजे.

आपल्या वर्तमान परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, आपल्याला झालेल्या पाचारणामध्ये विश्वासूपणा आवश्यक आहे. देवाने आपल्यावर जे काही सोपवले आहे, मग ती मोठी जबाबदारी असो किंवा छोटी, आपण विश्वासू असले पाहिजे. छोट्या कंपनीत अगदी माफक स्थितीतही विश्वासू राहा. कोणीही पाहत नसताना सुद्धा विश्वासू राहा, कारण देव सर्वकाही पाहतो.

कसोशीने काम करा. ज्याप्रमाणे पवित्र शास्त्र आपल्याला आठवण करून देते : ''**जो आपल्या धंद्यांत निपुण आहे अशा मनुष्याला तू पाहिले काय? तो राजांसमोर उभा राहील, तो हलकट माणसासमोर उभा राहणार नाही.**'' – नीतिसूत्रे २२:२९.

तुमच्या कामाच्या ठिकाणी तुमचे कौतुक होणार नाही – विश्वासू राहा. तुम्ही तुमच्या मित्रांमध्ये किंवा कुटूंबियांमध्ये दुर्लक्षित होऊ शकता – विश्वासू रहा. तुमच्या मंडळीतील लोकांच्या नजरेत तुम्ही महत्त्वाचे नाही आहात असे तुम्हाला जाणवेल – विश्वासू राहा. देव, अंतिम प्रतिफळ देणारा, तुमचे श्रम गुप्तपणे पाहतो आणि त्याच्या योग्य वेळी तो तुम्हाला सर्वांसमक्ष प्रतिफळ देईल. एक दिवस येईल जेव्हा परमेश्वर म्हणेल: ''**शाबास, चांगल्या व विश्वासू दासा, थोडक्यांवर तू विश्वासू झालास, मी तुला पुष्कळांवर नेमीन; तू आपल्या धन्याच्या आनंदात ये.**'' – मत्तय २५:२१.

मी प्रार्थना करतो की, आपण प्रामाणिकपणे आणि विचलित न होता, तसेच कोणतीही तडजोड न करता, समोर असलेल्या आव्हानांची पर्वा न करता विश्वासात दृढ उभे राहण्यासाठी देव आपल्याला सामर्थ्य देवो. आपण येशू ख्रिस्ताचे खरे राजदूत होण्याचा प्रयत्न करूया.

## २. धीराने धावा!

**.... आपल्यापुढे ठेवलेल्या धावेवरून धीराने धावावे.** – इब्री. १२:१

कोणत्याही खेळाडूसाठी चिकाटी किंवा धीर धरणे हा एक महत्त्वाचा गुण आहे. जेव्हा प्रवास कठीण होतो तेव्हा हार मानायला जागा नसते. यशासाठी समर्पण वृत्ती, शिष्टाचार आणि स्वतःच्या सुरक्षित आणि आरामदायी जागेमधून बाहेर पडण्याची इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. त्यासाठी कठोर परिश्रम, संघर्ष, घाम गाळणे, वेदना आणि निराशेच्या क्षणांचीही आवश्यकता असते.

त्याचप्रमाणे, आपली ख्रिस्ती वाटचाल ही काही सोपी नाही. आपल्याला संघर्षांचा सामना करावा लागतो, लढाईचा सामना करावा लागतो आणि आपल्या विश्वासाची परीक्षा घेणाऱ्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. काही वेळा, एकटेपणा वाटू शकतो, जणू काही आपण इतरांना समजत नसलेल्या रस्त्यावर चालत आहोत. सांसारिक मूल्यांशी सरेखित किंवा तडजोड करण्याची असमर्थता आपल्याला विचित्र असल्यासारखी वाटू शकते.

या भावना नैसर्गिक आहेत, परंतु आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, हा अरुंद आणि आव्हानात्मक मार्ग आपल्याला सार्वकालिक आनंद आणि पूर्णतेकडे नेतो. प्रत्येक पावलागणिक देव आपल्या पाठीशी आहे हे जाणून आपण अटल निर्धाराने पुढे जाऊया.

देवाच्या महान लोकांनी अशाच भावना अनुभवल्या. एलीयाने शोक व्यक्त केला, ''.... **मी एकटाच राहिलो**....'' – १ राजे १९:१०. दावीदाला अनेकदा एकाकीपणाचा भार जाणवत असे आणि मोशेने सुद्धा असे क्षण सहन केले. अशाप्रकारच्या भावना आपल्यासाठी नवीन नाहीत. तथापि, ''**आपण शर्यतीत टिकून राहण्यासाठी आपल्याला ज्याकडून सामर्थ्य प्राप्त होते, ते म्हणजे आपल्या आधी गेलेल्या लोकांची साक्ष.**'' (इब्री १२:१). त्यांची उदाहरणे आपल्याला आठवण करून देतात की, आपण हार मानू शकत नाही.

प्रवास जरी थकवणारा वाटत असला तरी आपण पुढे जाणे आवश्यक आहे. मदत मिळणे शक्य आहे. आपल्यापैकी काहींना निराशाजनक शब्द, खोटे आरोप, गैरसमज किंवा निराशेच्या आंतरिक भावनेचा सामना करावा लागत असेल, ते स्वतःस प्रश्न विचारत असतील, माझी धाव मी सुरु का ठेवावी, प्रभू? असे असले तरी, आपल्याला धीराने धावण्यास पाचारण केलेले आहे.

कुणालाही एकटेपणाची इच्छा नसते; आपण सर्व समावेशासाठी आतुर असतो. तरीसुद्धा, आपण आपल्या अंतःकरणाचे रक्षण केले पाहिजे. **जेव्हा आपण जगाशी मैत्री करण्यास इच्छितो, तेव्हा आपण देवाचे वैरी बनण्याचा धोका पत्करतो.**

(...पान ६ वर)

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२), गरजा भागविणे (रोम १२:१३), आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुती आणि प्रार्थनेचे विषय - १९ फेब्रुवारी, २०२५ पासून ते १८ मार्च, २०२५

**(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)**

## ✞ याकरीता देवाची स्तुती करा...

**फेब्रुवारी १९:** **मीडिया माध्यमातुन** होणाऱ्या सेवेला आणि बहुभाषिक लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या **एको ऑफ हिज कॉल** ह्या यु ट्यूब चॅनेलला आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २०:** आमच्या मंडळीच्या सेवेला अधिक संघटित पद्धतीने काम करण्यासाठी आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २१:** आमच्या **नहेम्या बायबल कॉलेजेस** आणि **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन स्कूलच्या** विद्यार्थ्यांचे दैवी संरक्षण केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २२:** आमच्या सहभागीदारांच्या नैतिक आणि आर्थिक पाठिंब्याद्वारे आम्हाला आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २३:** आमच्या प्रार्थनेतील सहभागीदार, सदस्यत्व घेणारे सहभागीदार, विश्वासातील सहभागीदार, आयुष्यभर सोबत करणारे सहभागीदार आणि महान आज्ञेचे सहभागीदार आणि त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यावरील दयेबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २४:** आमच्या ज्येष्ठ पाळकांच्या विविध सेवाकार्यांद्वारे शुभवर्तमानाचा प्रचार करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २५:** आमच्या मंडळीच्या सर्व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होण्यासाठी तरुणांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २६:** आमच्या **एको ऑफ हिज कॉलच्या** सहाय्यक संपादक आणि त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २७:** आमचे वरिष्ठ पाळक एस सॅम सेल्व राज व त्यांच्या कुटुंबियांना दुष्टाच्या सर्वप्रकारच्या शक्तीपासून सुरक्षित ठेवले याबद्दल देवाची स्तुती असो.

**फेब्रुवारी २८:** मुख्य मंडळी आणि त्याच्या इतर मंडळ्यांतील आमच्या रविवारच्या उपासनेमध्ये देवाच्या वचनाच्या सामर्थ्याबद्दल देवाची स्तुती असो.

**मार्च ०१ :** आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक्युलेशन शाळेचे** मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आशीर्वादित केल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**मार्च ०२ :** आमच्या कर्मचाऱ्यांना देवाने विपुलतेने दिलेल्या आशिर्वादाबद्दल त्याची स्तुती असो.

**मार्च ०३ :** आमच्या मुख्य मंडळीतील सदस्यांना सेवा करण्याचे मन दिल्याबद्दल देवाची स्तुती असो.

## ✞ कृपया यासाठी प्रार्थना करा...

**मार्च ०४ :** इस्राएल, पॅलेस्टाईन, रशिया, आणि युक्रेनमधील शांततेसाठी प्रार्थना करा.

**मार्च ०५ :** सर्व राष्ट्रांतील एकता आणि शांततेसाठी प्रार्थना करा.

**मार्च ०६ :** प्रचारामध्ये कोणतीही भेसळ न करता ख्रिस्ती प्रचारकांनी सुवार्तेचा प्रचार करावा यासाठी प्रार्थना करा.

**मार्च ०७ :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आमच्या निवासी आणि संध्याकाळच्या **नहेम्या बायबल कॉलेजसाठी** पात्र विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

**मार्च ०८ :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आमच्या **सेंट पॉल मॅट्रिक शाळेसाठी** नवीन विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी प्रार्थना करा.

**मार्च ०९ :** अनेक देशांतील मुले आणि तरुणांनी येशू ख्रिस्ताला त्यांचा वैयक्तिक तारणहार म्हणून स्वीकारण्यासाठी प्रार्थना करा.

**मार्च १० :** मोबाइल फोन आणि ऑनलाइन गेमच्या व्यसनापासून जगातील मुले आणि तरुण सुरक्षित राहावे यासाठी प्रार्थना करा.

**मार्च ११ :** वृद्धाश्रमातील वृद्ध लोकांसाठी प्रार्थना करा.

**मार्च १२ :** या महिन्यातील आपल्या सर्व गरजा आपल्या प्रभूने पूर्ण करावे यासाठी प्रार्थना करा.

**मार्च १३ :** आमचे सहभागीदार आणि राज्य समन्वयकांच्या चांगल्या आरोग्यासाठी प्रार्थना करा.

**मार्च १४ :** आम्हाला भारतातील अगम्य ठिकाणी सुवार्ता पसरविण्यास सक्षम करावे म्हणून प्रार्थना करा.

**मार्च १५ :** २०२५ या नवीन वर्षामध्ये देवाने विपुलतेने दया करावी यासाठी प्रार्थना करा.

**मार्च १६ :** आमचे ज्येष्ठ पाळक एस. सॅम सेल्व राज आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्य सर्व प्रकारच्या वाईट शक्तीपासून सुरक्षित राहावे यासाठी प्रार्थना करा.

**मार्च १७ :** जगातील सर्व महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करा.

**मार्च १८ :** आमच्या कर्मचारी सदस्यांच्या आरोग्यासाठी प्रार्थना करा.

(पान ४ वरुन)

(याकोब ४:४). पवित्र शास्त्र चेतावणी देते की, जे स्वतःला ऐहिक मूल्यांशी जुळवून घेतात त्यांची तुलना व्यभिचारी व व्यभिचारिणी अशी केली जाते.

म्हणून, देवाने आपल्या समोर ठेवलेल्या शर्यतीत आपण दक्ष राहिले पाहिजे. तडजोडीला कोणतेच स्थान नाही. स्थिर राहा, कारण बक्षीस अनंतकालीन आहे.

## ३. आपली धाव विजय होऊन पुर्ण करणे!

या शर्यतीचे अंतिम उद्दिष्ट फक्त पूर्ण करणे नाही तर विजयी रित्या पूर्ण करणे आणि बक्षीस मिळवणे हे आहे. प्रेषितांची कृत्ये २०:२४ मध्ये म्हटल्याप्रमाणे, **मी आपला जीव आपल्याला प्रिय मानीत नाही, जर मी शर्यत पूर्ण करू शकलो आणि प्रभु येशूने मला दिलेले कार्य पूर्ण केले तरच...**

प्रिय मित्रांनो, जीवन क्षणभंगुर आहे आणि येशू ख्रिस्तासाठी आपण जे काही करतो तेच टिकून राहील. आपण या वर्षाच्या सुरुवातीला उभे असताना, आत्मचिंतन करण्याची वेळ आली आहे. देवाने ठरविलेल्या शर्यतीमध्ये तुम्ही धावत आहात का? तुम्ही योग्य ट्रॅकवर धावत आहात का? तुम्हाला मागे ठेवू इच्छिणारे सर्वप्रकारचे व्यत्यय, अडथळे, आणि आव्हाने समोर असतांना सुद्धा तुम्ही आपले सर्वस्व पणाला लावून चिकाटीने धावत आहात का? तसे नसल्यास, हाच योग्य क्षण आहे की, तुम्ही त्यावर पुनर्विचार करावा.

चला विश्वासाने, धीर धरून आणि खंबीरपणे धाव पूर्ण करण्याच्या निर्धाराने धावूया. हार मानू नका! देव विश्वासयोग्य आहे. तो आपल्याला कधीही अशा ठिकाणी घेऊन जाणार नाही जिथे त्याची कृपा अपुरी आहे.

जर तुमच्यावरील ओझे भारी व खूप जड आहे असे वाटत असेल किंवा भावनिकरित्या तुम्ही थकून गेला असाल, तर देवासमोर या आणि पूर्णपणे अंतःकरणातून त्याच्यासमोर व्यक्त व्हा आणि म्हणा, हे प्रभु, मी या क्षेत्रात संघर्ष करीत आहे. हेओझे माझ्या खांद्यावर घेऊन मी धावू शकत नाही.

हिज्कीया राजाचे उदाहरण घ्या. अश्शूरच्या राजाचे बोलणे ऐकून त्याचे हृदय फाटले. त्याला पूर्णपणे असहाय्य वाटले. अश्शूरच्या राजाने त्याची आणि त्याच्या विश्वासाची थट्टा केली आणि म्हटले, माझ्याविरुद्ध उभे राहण्याची तुझी हिंमत कशी झाली? तुझ्यात कोणता आत्मविश्वास आहे? माझ्या हातून तुला कोण वाचवील? आता सर्व संपले. तुला कोणीही सोडवू शकत नाही. माझ्याशी लढण्यासाठी तुला हवे असल्यास, मी तुला २००० घोडे देईन, जर तुला त्यांच्यावर आपले स्वार बसवता येतील तर!

काय आव्हान आहे हे ! त्या क्षणी हिज्कीया राजाच्या मानसिक आणि भावनिक स्थितीची कल्पना करा. तरीही, निराशेमध्ये सुद्धा हिज्कीया देवाकडे वळला, जो त्याच्या शक्तीचा खरा स्रोत होता.

अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल? अश्शूरचे राजे बंदिवानांसाठी, विशेषतः प्रतिस्पर्धी राजांना त्यांच्या क्रूर वागणुकीसाठी कुप्रसिद्ध होते. हे माहित होते म्हणूनच, आता आपले भविष्य अंधकारमय झालेले त्याला दिसले. तो आपल्या विश्वासाचा त्याग करू शकला असता आणि त्यामुळे त्याच्यासमोर असलेली धाव तो पूर्ण करू शकला नसता. तथापि, यशया ३७ मध्ये एक वेगळा प्रतिसाद दिसून येतोः १. तो देवाच्या उपस्थितीमध्ये गेला – तो देवाच्या मंदिरात गेला व त्याने त्याच्या पुढे स्वतःला नम्र केले. २. त्याने आपले संकट देवाला सांगितले – त्याने आपले हृदय रिकामे केले आणि दैवी मार्गदर्शन मागितले. ज्याप्रमाणे दावीद स्तोत्रसंहिता ११९:२६ मध्ये लिहितो, **"मी आपले मार्ग प्रगट केले तेव्हा तू मला उत्तर दिले; तू आपले नियम मला शिकीव."** दुसऱ्या भाषांतरात असे आहे, मी तुला माझ्या आयुष्याबद्दल सर्व सांगितले. याप्रमाणे, आपल्याला आपल्या समस्या, अपयश आणि निराशा देवाकडे आणण्यास उद्युक्त केले जाते. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा तो आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग शिकवतो.

## धावणे चालूच ठेवा!

देवाच्या प्रिय लोकांनो, तुम्ही तुमच्या सेवेत विश्वासू राहण्यास कंटाळला आहात का? तुम्ही धीर धरण्यासाठी संघर्ष करीत आहात का? हार मानू नका! आता माघार घेण्याची वेळ नाही. जोपर्यंत तो तुम्हाला थांबायला सांगत नाही तोपर्यंत उठून धावत रहा!

कितीही आव्हाने समोर असली तरी धीराने धावूया.

## कसे धावू नये?

व्यर्थ धावू नका : गलतीकरांस २:२ मध्ये पौल लिहितो, "..... **तर कदाचित मी व्यर्थ धावत असतो किंवा व्यर्थ धावलो असे झाले असते.**"

(...पान ९ वर)

नहेम्या बायबल कॉलेजेस
चेपॉक आणि संतोषपुरम, वेलाचेरी, चेन्नाई
शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक
प्रवेशा करिता त्वरा करा ! माध्यम : तमिळ (अर्धवेळ)
ईश्वरविद्या डिप्लोमा हिंदी (निवासी) (स्पोन्सरशिप उपलब्ध)
संपर्क : अध्यक्ष : नहेम्या बाईबल कॉलेज
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५५ वर्षांपासून मान्यता प्राप्त
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲
REACHING NATIONS

## -: आमच्या मुख्यालयातील सेवाकार्या :-

१. प्रार्थना सेवा : २४ तास
२. **एको ऑफ हिज कॉल** : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन
३. **बायबलकोर** : मुळभूत बायबल अभ्यासक्रम (इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी)
४. पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ
५. नहेम्या बायबल कॉलेज : (चेपॉक, संतोषपुरम आणि वेलाचेरी)
६. महान आज्ञापालनाचे भागीदार : (पाळकांचे नेटवर्क)
७. प्रशिक्षण कार्यक्रम : सेमिनार आणि रीट्रीटो
८. महासभा
९. छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा
१०. शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : प्रकाशने
११. सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल
१२. रवीवारी शब्बाथ शाळा : सकाळी १०.३० आणि सायंकाळी३ वाजता-रविवारी (चेपॉक, वेलाचेरी, बालाजी नगर आणि संतोषपुरम)
**१३. सकाळची उपासना : रविवारी सकाळी ५.३० वाजता**
**१४. सुरुवातीची उपासना : रविवारी सकाळी ८.०० वाजता**
**१५. तामिळ उपासना : रविवारी सकाळी ८.३० वाजता**
**१६. युवा सभा : रविवारी दुपारी ११.०० वाजता**
**१७. सहभाग भोजन : रविवारी दुपारी १.०० वाजता**
**१८. हिन्दी उपासना : सायंकाळी ४ वाजता - रविवारी**
**१९. तेलगु उपासना : सायंकाळी ५ वाजता - रविवारी**
**२०. इंग्रजी आणि हिंदी उपासना : सायंकाळी ६ वाजता - रविवारी**
२१. अभिप्रायाची वेळ : सायंकाळी ७.३० वाजता - रविवारी
२२. स्रियांची प्रार्थना : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी
२३. पुरुषांची प्रार्थना : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी
२४. शिष्यत्वाची सभा : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी
२५. गृह प्रार्थना सभा : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी
२६. विशेष प्रभु भोजन : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी
२७. सेवाकाची समालोचन सभा : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार६
२८. पालकांची प्रार्थना : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार
२९. रात्रभर प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शुक्रवार
३०. उपास प्रार्थना : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शनिवार
३१. पवित्र सहभागिता : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत
३२. तरुण/तरुणी/लहान लेकरांसाठी प्रार्थना : दररोज रात्रो १० वाजता (फोन द्वारा)
३३. कार्यालयीन स्टाफचे मनन : सकाळी ९ वाजता - दररोज
३४. कार्यालय : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून)

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

**केवळ भारतातील उमेदवारां करीता**

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्या बाईबल कॉलेज**
एको ऑफ हिज कॉल, पोस्ट बॉक्स नं. २९५७,
चिपॉक, चैन्नई - ६०० ००५
फोन : (०४४) २८५२ ८२८२, २८५२ ९२९३,
फोन : ९८४१० ७१८५२, ९५६६१ ३१८५८
E-mail: biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | |
|---|---|
| **Account Name** | : **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : **1023 2923 805** |
| **Bank Name** | : **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

**''जे कोणतेही हत्यार तुझ्याविरुद्ध चालवायला घडलेले आहे ते साधणार नाही; आणि जी प्रत्येक जीभ न्यायात तुझ्याविरुद्ध वाद करायला उठेल ती तू अन्यायी ठरवशील....'' - यशया ५४:१७.**

बहुतेक वेळा, जेव्हा जेव्हा आम्ही देवाच्या राज्याच्या विस्तारासाठी नवीन सेवा सुरू केली तेव्हा तेव्हा आम्हाला विविध प्रकारच्या विरोधांना आणि अडचणींना तोंड द्यावे लागले. कधी संकटे थेट सैतानाकडून आली तर कधी संकटे माणसांकडून आली. अनेक वेळा एकट्यानेच मला अडचणींचा आणि विरोधाचा सामना करावा लागला.

जेव्हा आम्ही सेवेच्या मुख्य कार्यालयाची इमारत बांधत होतो, तेव्हा त्या परिसरात राहणारे लोक खूप नाराज होते. बांधकाम सुरू असताना त्यांनी मला जास्तीत जास्त त्रास देण्याचा प्रयत्न केला होता. त्यात काम करणाऱ्या कामगारांनाही खूप त्रास दिला गेला, ज्यामुळे बहुतेक कामगारांनी नोकरी सोडली आणि मला माझे काम चालू ठेवणे फार कठीण झाले. प्रचंड विरोध पाहून ख्रिस्ती असलेल्या बांधकाम कंत्राटदारानेही कामगारांना घेऊन घटना स्थळावरून पळ काढला.

काही लोक जे परमेश्वराच्या कार्याच्या विरोधात होते त्यांनी माझ्याकडे अतिशय अलगदपणे संपर्क साधला आणि मला त्या विशिष्ट ठिकाणी परमेश्वराचे कार्य थांबवण्यास सांगितले आणि ख्रिस्ती वस्ती असलेल्या दुसऱ्या ठिकाणी जाण्यास सांगितले, त्यासाठी त्यांनी मला खूप पैसे देण्याची ऑफर दिली. सेवेसाठी झालेल्या पाचारणात मी खूप दृढ होतो, त्यामुळे मी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास तयार नव्हतो. मी त्यांना नम्रपणे सांगितले की, हे जिवंत देवाचे काम आहे आणि म्हणून त्यांना मी विनंती केली की, त्यांनी कोणत्याही प्रकारे या कामाच्या विरोधात उभे राहू नये.

पण ते मला मानसिक आणि शारीरिक त्रास देत राहिले. या परीक्षेच्या समयी, माझ्या मदतीकरिता मी शहरातील विविध ख्रिस्ती नेते आणि ख्रिस्ती वकिलांशी संपर्क साधला. दुर्दैवाने कोणीही माझ्या मदतीला आले नाही. पण मी प्रार्थनेत बराच वेळ घालवला, देवाला माझ्याबरोबर राहण्याची विनंती केली. त्यामुळे विश्वासाने पुढे जाण्यासाठी मला शांती प्राप्त झाली.

उदाहरणार्थ, एके दिवशी कॉंक्रीट फरशीचे काम सुरू करण्यासाठी मिश्रित कॉंक्रीटचे ट्रक आले आणि काम सुरू झाले. काही शेजारचे लोक मला विरोध करण्यास आले आणि कामाच्या विरोधात ते आरडा ओरड करू लागले. मला काय करावे हे समजत नव्हते आणि त्यामुळे मिश्रित कॉंक्रीटचे ट्रक संबंधित कंपनीला मला परत पाठवावे लागले, पण तरीही मला त्याचे पैसे द्यावे लागले. पण काही दिवसांनी देवाने मला काम पूर्ण करण्यास मदत केली.

शेवटी, संपूर्ण काम संपल्यानंतर, मी माझ्या मित्रांना आणि हितचिंतकांना निमंत्रण पत्रे पाठवू लागलो, आणि त्यांना इमारतीच्या समर्पण सेवेला उपस्थित राहण्याची विनंती केली. तोपर्यंत माझ्या आणि देवाच्या कार्याच्या विरोधात उभे असलेले सर्व लोक दिसेनासे झाले होते. कौटुंबिक समस्यांमुळे काहींना परिसर सोडावा लागला; त्यांच्यापैकी काहींनी आपली मालमत्ता विकली आणि ते निघून गेले; आणि जे प्रभूच्या कार्याविरुद्ध उभे राहिले होते, त्यांच्या जीवनात अनेक दुःखद घटना घडल्या. पण सर्वात दुःखाची गोष्ट ही होती की, समर्पण सेवेला त्यांनी उपस्थित राहावे म्हणून त्यांना आमंत्रित करण्यासाठी मी त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचा किंवा त्यांच्या कुटुंबीयांचा मला शोध लागला नाही. काही इमारतींना आजही टाळे लावण्यात आले आहे आणि तिथे फार काळ कोणीही राहत नाही. काही इमारतींना पाडून टाकण्यात आले आणि आता तिथे काहीच उरलेले नाही.

आता देवाच्या कार्याला विरोध करणारा कोणीही नाही. आमचा हा परिसर त्या भागातला सर्वात वर्दळीचा परिसर झालेला आहे. लोक मुक्तपणे देवाची उपासना करतात. देवाच्या राज्याच्या विस्तारासाठी रात्रंदिवस अनेक उपक्रम सुरू आहेत. पवित्र शास्त्र सांगते : **''जे तुझे शत्रू तुझ्यावर उठतात ते तुझ्यापुढे मारले जातील असे यहोवा करील; ते तुझ्यावर एका वाटेने बाहेर येतील, आणि ते तुझ्यापुढे सात वाटांनी पळून जातील.''** - अनुवाद २८:७. **''जे तुझ्याशी भांडतात त्यांचा शोध तू करशील तरी ते तुला संपणार नाहीत; जे तुझ्याविरुद्ध लढाई करतात ते शून्यवत व काहीच नाही असे होतील.''** - यशया ४१:१२.

प्रिय मित्रांनो, तुम्ही चांगले काम करण्याचा प्रयत्न करीत असतानाही तुमच्या जीवनात तुम्ही मोठ्या संकटांतून आणि अडथळ्यांतून प्रवास करीत आहात का? धीर धरा आणि देवाचे मुख पहा. जरी तुम्ही तुमच्या आयुष्यात सर्वकाही गमावले असेलही, तरीही पुढे भविष्य कायम आहे.

(पान ६ वरुन)

देवाने आपल्यासमोर ठेवलेल्या शर्यतीत धावण्यासाठी आपण सावध असले पाहिजे आणि आपले प्रयत्न वाया घालवू नयेत. जागतिक दर्जाची धावपटू शायनी अब्राहम हिच्याकडून मिळालेला धडा विचारात घ्या. तिने आपली शर्यत प्रथम पूर्ण केली असली तरी एका छोट्या, नकळतपणे झालेल्या चुकीमुळे तिचे पदक हुकले.

कधीकधी आपण मेहनती, समर्पित आणि विश्वासू असू शकतो, पण तरीही बक्षीस जिंकण्यात अपयशी ठरतो. का? कारण देवाला आपल्याकडून खरोखर काय हवे आहे याकडे आपण कदाचित दुर्लक्ष करतो. धावण्यासाठी त्याने आपल्यासाठी तयार केलेल्या विशिष्ट शर्यतीचे प्रयोजन समजून घेण्यास आपण कदाचित कमी पडतो.

त्याची इच्छा मिळविण्यासाठी, त्याचा उद्देश जाणून घेण्यासाठी आणि त्याचे संदेश आत्मसात करण्यासाठी आपण आपला समय देऊया. त्याने आपले जीवन विलक्षणरित्या रचले आहे. तरच आपण ध्येयपूर्ण धावू शकतो आणि शर्यत विजयीपणे पूर्ण करू शकतो.

२ शमुवेल १८ मध्ये, एक रोमांचक घटना आपल्या समोर येते. यवाब दावीद राजाचा मुलगा अबशालोम विरुद्ध लढत होता. संघर्ष असूनही, दावीदाने स्पष्टपणे आज्ञा दिली होती की, अबशालोमला कोणतीही हानी पोहोचू नये. तथापि, युद्धादरम्यान, यवाबने विजय मिळवला खरा, परंतु अबशालोम मारला गेला. ही दु:खद बातमी दावीदापर्यंत पोहोचवणे आवश्यक होते - हे एक अत्यंत संवेदनशील काम होते.

दोन माणसे धावत दावीदाकडे वर्तमान घेऊन आले. तथापि, यवाबाने अहीमासाला आज वर्तमान घेऊन न जाता दुसऱ्या दिवशी घेऊन जाण्यास सांगितले. त्याऐवजी, यवाबाने कूशीला वर्तमान घेऊन जाण्याकरिता निवडले आणि त्याला त्याने जे काही पाहिले ते सांगण्यास सांगितले. कूशी धावू लागला, परंतु अहीमासने सुद्धा वर्तमान सांगण्यासाठी आग्रह धरला, आणि अखेरीस त्याने यवाबाचे मन वळविले व तो सुद्धा धावू लागला. अहीमास हा वेगाने धावणारा असल्याने त्याने कूशीला मागे टाकले आणि दाविदाकडे आधी पोहोचला.

दावीद मोठ्या आशेने वाट पाहत होता, त्याने अहीमासला युद्धाच्या निकालाबद्दल उत्सुकतेने विचारले. तथापि, वेगाने धावत येऊन आणि इतके प्रयत्न करून सुद्धा त्याला संपूर्ण तपशील माहित नसल्याचे कबूल केले: ".... **मी मोठी गर्दी पाहिली, परंतु काय होते हे मला कळले नाही.**" - २ शमुवेल १८:२९. त्याच्याकडे कोणतेही वर्तमान नव्हते, पण तरीही तो मोठ्या निष्ठेने आणि चिकाटीने अथकपणे धावला.



*कूशीने दावीदाला युक्तीपूर्ण अबशालोमच्या मृत्युची माहिती दिली*

याउलट, कूशी जरी हळू धावला असला, तरी एक संदेशवाहक म्हणून आपली जबाबदारी पार पाडली. जेव्हा तो तेथे पोहोचला तेव्हा त्याने स्पष्टपणे आणि हळुवारपणे वर्तमान सांगितले. दाविदाच्या प्रश्नाला उत्तर देताना कूशी म्हणाला, "**माझ्या प्रभुराजाचे शत्रू व तुझे वाईट करायला जे तुझ्यावर उठतात ते सर्व जसा तो तरुण आहे तसे होवोत.**" - २ शमुवेल १८:३२. थेट माहिती न सांगता, कूशीने दावीदाला युक्तीपूर्ण अबशालोमच्या मृत्यूची माहिती दिली.

अहीमास आणि कूशी यांच्यातील तुलना उल्लेखनीय आहे. अहीमास एक चांगला धावणारा होता पण एक बिचारा वर्तमान सांगणारा ठरला, कारण त्याच्याकडे सर्वात महत्त्वपूर्ण गोष्टीचा अभाव होता - वर्तमानाचा. वर्तमान सांगणाऱ्याची पहिली जबाबदारी असते ती योग्य प्रकारे वर्तमान सांगणे, मग ते कितीही वक्तृत्वपणे प्रस्तुत केले गेले तरी.

या परिच्छेदावर आपण मनन करीत असता, त्यामध्ये असणाऱ्या धड्याकडे आपण लक्ष देऊया: अहीमासप्रमाणे धावू नका!

माझ्या प्रिय बंधू आणि बहिणींनो, या वर्षाची आपण सुरुवात करीत असता, केवळ वेग आणि प्रयत्नांनी नाही, तर उद्देश आणि आणि स्पष्टतेसह धावूया. जिंकण्यासाठी धावूया!

*******


# तातडीची गरज

**एको ऑफ हिज कॉलची जलदगतीने वाढ होत आहे. आम्हाला मिशन विचारसरणी असलेले; समर्पित आणि विश्वासू पुरुष आणि स्त्री उमेदवार खालील पदांकरीता हवे आहेत.**

- ⇨ मुख्य मंडळी करिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ⇨ चैन्नाईमधील शाखा मंडळ्यांकरिता पूर्ववेळ सहकारी पाळक
- ⇨ पूर्णवेळ सुरक्षा रक्षक
- ⇨ डी.टी.पी. चालक आणि टंकलेखक
- ⇨ इंग्रजी आणि इतर भाषा बोलू आणि लिखाण करू शकणारे व्यावसाईक
- ⇨ व्यवस्थापनात इच्छुक असलेले कार्यालय मॅनेजर
- ⇨ पूर्ववेळ बायबल कॉलेजकरिता व्याख्याते
- ⇨ आमचे सेवाकार्याची ओळख करुन देणारे स्वयंसेवक
- ⇨ पूर्ववेळ वाहन चालक
- ⇨ मॅट्रीक्युलेशन शाळेकरिता प्रिन्सीपल आणि शिक्षक
- ⇨ पूर्ववेळ स्वयंपाकी (स्त्री उमेदवार)
- ⇨ पूर्ववेळ स्वच्छता पाहणारे कर्मचारी वर्ग

वेतन :- अनुभव आणि पात्रतेवर आधारीत

**एको ऑफ हिज कॉलला अर्ज करा**
वॉटस्अप नंबर : 98412 71858
ईमेल : sam@echoofhiscall.org

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/24-26 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/24-26

## Echo of His Call

**YouTube**
**Please subscribe**

Kindly view and subscribe our **Echo of His Call YouTube Channel** when you get time. Thanks.

- Editor

## OUR BANK DETAILS:

### 1. Bank : State Bank of India

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : S. Sam Selva Raj |
| A/C No. | : 1023 2934 679 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |
| SWIFT CODE | : SBI NIN BB 455 |

### 2. Bank : ICICI Bank

| | |
|---|---|
| Branch | : Anna Salai, Chennai-6 |
| Name | : Echo of His Call |
| A/C No. | : 6038 0502 2319 |
| IFSC | : ICIC 000 6038 |

### 3. Bank : State Bank of India

(This Account is for Tax Exemption for Indians only )

| | |
|---|---|
| Branch | : Triplicane, Chennai-5 |
| Name | : Echo of His Call Educational Trust |
| A/C No. | : 1023 2923 805 |
| IFSC | : SBIN 00 00 249 |

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ
*****
E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-    आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/24-26
WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/24-26
Date of Publication: Second week of every month
Date of Posting : 11th & 12th of every month
Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"
on 12th FEBRUARY 2025.
If un-delivered please return to:
ECHO OF HIS CALL (MARATHI)
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

To

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj at Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**